महाराष्ट्र शासन

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तासगांव यांचे कार्यालय, तासगांव

दूरध्वनी क्रमांक- ०२३४६/२४००९९ ईमेल आयडी-arcstsg@rediffmail.com

जाक्र. १०६६ /सनिता/कक्ष-१/प्राधिकृत अधिकारी / / नियुक्ती/आदेश/सन -२०१८.

दिनांक- ०१/०१/२०१८

वाचले :-

१) सचिव, खुजगांव वि.का.स. (विकास) सेवा संस्था मर्या.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली यांचे कडील दिनांक- ४.१२.२०१७ रोजी या कार्यालयास संस्थेच्या कामकाजाबाबत सादर केलेला अहवाल.

२) या कार्यालयाचे जा.क्र.सनिता/का.क.७७अ/विकास/अपात्र/२०१६ दिनांक १४.१२.२०१७ रोजीची नोटीस.

३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे का.क. ७७ अ मधील तरतुद

---

ज्याअर्थी, **खुजगांव वि.का.स. (विकास) सेवा संस्था मर्या.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कायदयातील तरतुदीनुसार नोंदवलेली सहकारी संस्था असुन **(यापुढे सदर संस्थेच्या नावाचा उल्लेख संस्था असा करणेत येईल)** सदर संस्था या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात व अधिकारकक्षेत येते.

ज्याअर्थी, उपरोक्त वाचले क्रं. १ ने संस्थेचे सचिव यांनी सादर केलेल्या अहवालानुसार संस्थेच्या एकुण कार्यरत १२ संचालकापैकी ८ संचालकांनी दिनांक २२/११/२०१७ रोजी घरगुती अडचणीमूळे संस्थेस वेळ देता येत नसलेचे नमूद करुन लेखी राजीनामे संस्थेकडे सादर केले होते. त्यास अनुसरुन प्राप्त राजीनामे अर्जावर पुढील कार्यवाही करणेसाठी दिनांक २४.११.२०१७ रोजी संचालक मंडळाच्या सभेची नोटीस काढून ती नोंदणीकृत डाकेने देणेत आलेली होती. सदर नोटीसीप्रमाणे संस्थेच्या कार्यालयात संचालक मंडळ सभा दिनांक २.१२.२०१७ रोजी असलेचे नमूद करुन वेळ सकाळी ११.०० वा. नमूद करणेत आलेले होते. तथापि सदर सभेस कोणीही उपस्थित राहिले नसलेने संचालक मंडळ सभा गणपुर्ती अभावी तहकुब झालेली असलेचे या कार्यालयाचे निदर्शनास आले आहे. उक्त संस्थेच्या समितीने कार्य करणेचे बंद केलेने उक्त संस्थेचे कामकाज ठप्प होण्याची दाट शक्यता असलेने संस्था सभासदांच्या हिताची जपवणुक करणेच्या दृष्टीने उक्त संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करुन उक्त संस्थेचे दैनंदिन कामकाज पुर्ववत चालु करणे आवश्यक असलेने उपरोक्त वाचले क्रं. २ च्या नोटीसीने संबंधीतांना संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांच्या नियुक्ती बाबत अभिप्राय, सुचना, हरकती **दिनांक २१.१२.२०१७ पर्यत** दाखल करणेबाबत कळविणेत आले होते.

ज्याअर्थी, उपरोक्त वाचले क्रं. २ च्या नोटीस अन्वये संघीय संस्था या नात्याने सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सांगली या बँकेस उक्त संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांच्या नियुक्ती बाबत त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय पाठविणेबाबत कळविले होते. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सांगली यांनी या बाबत कोणतेही म्हणणे दाखल केलेले नाही.

ज्याअर्थी, उक्त संस्थेच्या व्यवस्थापक समिती सदस्य संस्थेचे कामकाज चालविणे बाबत निष्क्रीय, उदासिन असलेचे व संस्था सभासदांच्या हिताची जपवणुक करणेस त्यांना कोणतेही स्वारस्य नसलेचे या कार्यालयाचे निदर्शनास आले आहे.

ज्याअर्थी, **९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कायदयात आमुलाग्र बदल करणेत आले आहेत. व त्यानुसार सर्व सहकारी संस्थांच्या उपविधीत शासनाने बदल केलेले आहेत. व नवीन उपविधीनुसार क्रियाशील संस्था सभासद हेच संस्थेचे आधारस्तंभ असुन त्यानुसार संस्था सभासदांच्या हिताची जपवणुक व्यवस्थापक समिती करीत नसलेचे या कार्यालयाचे स्पष्टपणे निदर्शनास आले आहे.**

ज्याअर्थी, सभासदांच्या हिताची जपणुक न करणे, संस्थेचे कामकाज ध्येय धोरणाप्रमाणे न चालविणे, सचिव यांनी अयोजित केलेल्या व्यवस्थापक समिती सभांना जाणीवपूर्वक गैरहजर रहाणे, संस्थेच्या उपविधीतील तरतुदीनुसार व्यवस्थापक समिती सभांना गैरहजर असलेल्या संचालकांवर कारवाई न करणे, उपविधीतील तरतुदींचे व त्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कायदयातील तरतुदींचे

Scanned by CamScanner

...न करणे, इत्यादी बाबींचे उल्लंघन कार्यरत व्यवस्थापक समिती करीत असलेचे व त्याचे परिणाम संस्थेच्या आर्थिक स्थैर्यावर होतअसलेचे या कार्यालयाचे निदर्शनास आले आहे. व या सर्व वरील बाबीस संस्थेची व्यवस्थापक समिती पुर्णत: जबाबदार आहे. अशा निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

त्यामुळे संस्था सभासदांच्या हिताची जपवणुक करणे व संस्थेचे ठप्प झालेले कामकाज चालविणे आवश्यक व गरजेचे असलेने, संस्थेची व्यवस्थापक समिती बरखास्त करुन प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झाली आहे. तसेच संघीय संस्थेकडुन उक्त संस्थेने संस्था सभासदांच्या गरजा भागविणेसाठी कर्ज घेतले असुन सदर कर्जाची परतफेड करणेची जबाबदारी व्यवस्थापक समितीची आहे.

त्याअर्थी, खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-: आ दे श :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे का. क. ७७ अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी शंकर एम. पाटील, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पलूस, ता. पलूस, जि. सांगली **खुजगांव वि.का.स. (विकास) सेवा संस्था मर्या.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली** या संस्थेचे सर्व कार्यरत संचालक मंडळ बरखास्त करुन त्या जागी **बॅक इन्स्पेक्टर, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि. सांगली शाखा बस्तवडे ता.तासगांव जि.सांगली यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांचा कालावधी या आदेशाचे तारखेपासुन ६ महिन्यांसाठी राहील.**

**सदरचा आदेश आज दिनांक ०१/०१/२०१८ रोजी माझे सही शिक्यानिशी दिला असे.**

सही/-
**( शंकर एम. पाटील )**
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, तासगांव**

**प्रति,**

१) सचिव, खुजगांव वि.का.स. (विकास) सेवा संस्था मर्या.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली
२) श्री.पाटील सुभाष रामचंद्र रा.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली
३) श्री.पाटील जगन्नाथ मारुती रा.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली
४) श्री.देशमुख संतोष ज्ञानदेव रा.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली
५) श्री.जाधव भगवान आनंदा रा.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली
६) श्री.पाटील नाथा आनंदा रा.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली
७) श्री.पाटील बबन पांडूरंग रा.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली
८) श्री.पाटील संपत भगवान रा.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली
९) श्री.डावरे बाबासो देवाप्पा रा.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली
१०) पाटील शालन धोंडीराम रा.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली
११) पाटील छबूताई शिवाजी रा.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली
१२) श्री.गायकवाड शिवाजी महादेव रा.खुजगांव ता.तासगांव जि.सांगली
१३) **बॅक इन्स्पेक्टर, सागली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि. शाखा- बस्तवडे ता. तासगांव जि.सांगली.**

आपणांस कळविणेत येते कि, आपण उक्त संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा त्वरीत ताबा घेऊन चार्ज यादीसह अहवाल या कार्यालयास सादर करावा. व संस्थेच्या प्रशासकीय कामकाजास सुरुवात करावी. तसेच उक्त संस्थेच्या सदयस्थितीच्या कामकाजाचा अहवाल दर ८ दिवसांनी या कार्यालयास सादर करावा. व या कार्यालयाचे नियंत्रणाखाली व मार्गदर्शनाखालील उक्त संस्थेचे कामकाज चालवावे.

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर</u>:-**

१) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली
२) मा. जिल्हा विशेष लेखापरीक्षक ( वर्ग - १) सहकारी संस्था, सांगली
३) मा. कार्यकारी संचालक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि. सांगली

**सहाय्यक निबंधक,**

Scanned by CamScanner